# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2018-19)/44/ of 2018**

## परिपत्रक:

विषय:— सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करणेबाबत.

संदर्भ:— शिक्षण संचालनालयाचे क्र. उशिसं/ मवि—१/ राष्ट्रीय एकता दिवस/ परिपत्रक/२०१८/१८१६५ दिनांक २४—१०—२०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आपल्या देशाची एकता, अखंडता व सुरक्षितता अबाधित ठेऊन देशाच्या प्रती आपली निष्ठा अधिक मजबूत करण्यास उत्तेजन मिळण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांचा दिनांक ३१ ऑक्टोबर हा जयंती दिन दरवर्षी **"राष्ट्रीय एकता दिवस शपथ"** म्हणून संपूर्ण देशभर साजरा करण्यात येतो. प्रतीवर्षीप्रमाणे या वर्षी देखील दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी राज्यात एकता शपथ, एकता दौड व इतर कार्यक्रमांचे आयोजन करून एकता दिवस पाळण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यासाठी शपथ घेण्यासाठी **"राष्ट्रीय एकता दिवस शपथ"** चा मसूदा सोबत जोडण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सरदार वल्लभभाई पटेल यांचा दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी "राष्ट्रीय एकता दिवसाचे" आयोजन करण्यात यावे.

मुंबई—४०० ०३२
०५ नोव्हेंबर, २०१८

(प्रो. सुनिल भिरूड)
प्र—कुलसचिव